**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर यांचे न्यायालयात.**

(दिनांक २८ जुलै, २०२६ रोजी अधिघोषीत)

संक्षिप्त फौ.प्रकरण क्रमांक – ४१६/२०२६

**शासन विरुध्द गंपु**

(**CNR No.MHLA**060014142026)

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | – ०२/०६/२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | – ०२/०६/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नांव | – महाराष्ट्र शासन,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन किनगाव ता. अहमदपुर. |
| ४. | आरोपीचे नाव | – **गंपु वैजनाथ फड,**<br>वय – ६६ वर्षे, धंदा– चालक,<br>रा.धसवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर. |
| ५. | गुन्हयांचा तपशिल | – |

तुम्ही दिनांक ०६/०६/२०२६ रोजी १५.०० वाजताचे सुमारास मौजे किनगाव, ता.अहमदपूर येथील सावरकर चौकातील शुभम ऑटोमोबाईलसमोर रोडवर मध्यभागी सार्वजनिक रहदारीचे ठिकाणी येणारे– जाणारे वाहनांना व लोकांचे जिवीतास धोका होईल अशा प्रकारे तुम्ही तुमच्या ताब्यातील टाटा कंपनीचा झेस्ट एक्स इ बीएसफोर ज्याचा क्रमांक एमएच १२ क्युजी ७९४७ हा मध्यभागी उभा करुन रहदारीस अडथळा करीत असताना मिळून आलात व याद्वारे तुम्ही माझे अखत्यारीमध्ये भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे.

**<u>आरोपीचे प्रतिकथनः–</u>**

प्रश्न – तुम्हाला पोलीस केस पेपरच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न – तुम्हाला वाचून दाखविलेला आरोप समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय.

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

आरोपीची सही.

आरोपीला माझे समक्ष आरोपाचा तपशील त्याच्या भाषेत वाचून दाखविण्यात आला, तो त्यास कबूल आहे.

WADGAONKAR SWANANDI DEVIDAS Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS Date: 2026.07.28 17:13:42 +0530

**दिनांक** –२८.०७.२०२६ **( एस.डी. वडगांवकर )**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर

## आ दे श

## (दिनांक २८.०७.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी नामे **गंपु वैजनाथ फड** याने स्वेच्छेने भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध गुन्हा कबूल केला आहे. आरोपीस दोषारोपातील शिक्षेबाबत माहिती करुन दिली असता, आरोपीने तो स्वतः त्याचे घराचा प्रमुख असुन तो घरी असल्याचे कथन करुन कमीत कमी शिक्षा द्यावी याबाबत विनंती केली. आरोपी हा स्वतःहून गुन्हा कबूल करीत असलेबाबत खात्री झाली. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करणे योग्य ठरेल.

## आ दे श

आरोपी नामे **गंपु वैजनाथ फड** यास भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये च्या गुन्हयाकरीता दोषी करण्यात येते व आरोपीस **१०००/– (अक्षरी एक हजार रुपये केवळ)** द्रव्य दंडाची शिक्षा देण्यात येते. जर आरोपीने द्रव्य दंडाची रक्कम भरली नाही तर आरोपीने ०३ दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

WADGAONKAR SWANANDI DEVIDAS Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS Date: 2026.07.28 17:13:46 +0530

**दिनांक** – २८.०७.२०२६ **( एस.डी. वडगांवकर )**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर